उपनिबंधक सहकारी संस्था (गट-अ)
या संवर्गातील बदल्यांबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. राजस २०१७/प्र.क्र.१४८/५-स
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०७ नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा:-</u> शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. राजस २०१७/प्र.क्र.१४८/५-स, दिनांक ३/६/२०१७

शासन निर्णय :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(१), ४(२), ४(३), ४(४), ४(५) व ६ मधील तरतूदीनुसार सहकार विभागातील खाली नमुद केलेल्या उपनिबंधक, सहकारी संस्था, गट-अ या संवर्गातील अधिका-यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी बदल्या करण्यात येत आहेत.

अ.क्र	अधिका-याचे नाव	सध्याचे कार्यरत /पदस्थापनेचे ठिकाण	बदलीचे ठिकाण
१.	श्री. पी. एम. बर्गे	जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद	उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर (रिक्त पदावर)
२.	श्री. ज्ञानेश्वर खाडे	सध्या नियुक्तीच्या प्रतिक्षेत	जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, चंद्रपूर (सद्य:स्थितीत श्री. खाडे यांच्या सेवा कर्ज माफीच्या कामासाठी विशेष कक्ष, मुंबई नवीन प्रशासकीय भवन येथे उपयोगात आणण्यात याव्यात. सदर विशेष कक्षात श्री. खाडे यांनी तातडीने रूजू व्हावे. कर्ज माफीचे काम संपल्यानंतर श्री. कौसाडीकर यांना चंद्रपूर येथून त्यांच्या बदलीच्या पदावर नागपूर येथे रूजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात आल्यानंतर त्यांच्या कार्यमुक्ततेमुळे रिक्त होणा-या पदावर श्री. खाडे यांनी रूजू व्हावे. श्री. खाडे यांचा प्रतिक्षाधीन कालावधी नियमित करताना सदर कालावधी देखील नियमित करण्यात येईल)
३.	श्री. एस. एम. तांबे	उपनिबंधक सहकारी संस्था मुख्यालय, पुणे	प्रादेशिक उप संचालक (वस्त्रोद्योग) मुंबई (विनंतीनुसार बदली)
४.	श्री. एम. के. अहिरे	उपनिबंधक/उपसर-व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, रत्नागिरी	उपनिबंधक, खादी व ग्रामोद्योग विकास महामंडळ, मुंबई (रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने)
५.	श्रीमती. सुरेखा ए. फुफाटे	उपनिबंधक सहकारी संस्था, तालुका अकोला	उपनिबंधक सहकारी संस्था, मुख्यालय, पुणे (श्री. तांबे यांच्या विनंती बदलीमुळे रिक्त होणा-या पदावर विनंतीनुसार बदली)

२. उपरोक्त अधिका-यांनी आपल्या पदाचा कार्यभार समकक्ष वा नजीकच्या कनिष्ठ अधिका-यांकडे सोपवून तात्काळ कार्यमुक्त व्हावे व नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रूजू व्हावे व तसा अहवाल सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेमार्फत शासनास सादर करावा.

३. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७११०७१६११४०८८०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing Tax Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334eddf7e75d09609003b414273f73, cn=Sudin Gaikwad
Date: 2017.11.07 16:00:08 +05'30'

(डॉ. सुदिन गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे
२. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे/संचालक (वस्त्रोदयोग)/कार्यकारी संचालक खादी व ग्रामोदयोग विकास महामंडळ, मुंबई
३. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ वाशिम/यवतमाळ/ कोल्हापूर/चंद्रपूर/ रत्नागिरी/अकोला/ उस्मानाबाद
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
६. संबंधित अधिकारी, द्वारा सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे
७. प्रधानसचिव, मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालय
८. खाजगी सचिव, मा. मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग
९. खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग
१०. स्वीय सहायक, अपर मुख्य सचिव, (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
११. स्वीय सहायक, अपर मुख्य सचिव, (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
१२. स्वीय सहायक, प्रधान सचिव, (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
१३. सर्व विभागीय सहनिबंधक (प्रशासन)/सर्व विभागीय सहनिबंधक(लेखापरिक्षण)
१४. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती (कार्या-५स).